# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रोजगार हमी योजना, अनुदान वाटप फाईल व इतर महत्त्वाच्या फाईल ठाणे येथील कृषी भवन लेखा विभागातून गहाळ झाल्याबाबत**

**(१) २०५०९ (१४-०८-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजना, अनुदान वाटप फाईल व इतर महत्त्वाच्या फाईल ठाणे येथील कृषी भवन लेखा विभागातून मे महिन्यात गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२३-०३-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय कृषी भवनमध्ये तळमजल्यावर कार्यरत होते. सदर इमारत वापरण्यास धोकादायक असल्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांची तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी यांचे कार्यालयात करण्यात आली होती. अभिलेख मात्र जुन्या कार्यालयातच होते. जुन्या कार्यालयाची लोखंडी ग्रील तोडून चोरट्यांनी जुन्या अभिलेख्याचे गठ्ठे चोरुन नेले. त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये गु.नं.१०४/२०१५ दि. २ मे, २०१५ अन्वये एफआयआर नोंदविण्यात आला असून पोलीस चौकशी सुरु आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत जव्हार (जि.पालघर) रस्ता रुंदीकरणाच्या बनावट कामाबाबत**

**(२) २४९०३ (१४-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत जव्हार तालुक्यात (जि.पालघर) रस्ता रुंदीकरण कामात बनावट कामे व मृत व्यक्तीला कामगार दाखविणाऱ्यांविरुध्द जिल्हाधिकारी यांनी गुन्हे दाखल करण्याचे आदेश माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही जणांविरुध्द कारवाईचे प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयात प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आहे,

(४) असल्यास, त्यानुसार दोषींवर संघटीत गुन्हेगारी कायदा (एमपीडीए) अन्वये कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, तथापि विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांचे आदेश क्र.मग्रारोहयो/का-१/टे-४/सीआर-१८२११५ दिनांक २६-०६-२०१५ अन्वये शाखा अभियंता यांना निलंबित करण्यात आले असून २ ग्रामरोजगार सेवकांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. शाखा अभियंता यांच्या विभागीय चौकशीचे प्रकरण विभागीय आयुक्त यांचेकडे सुरु आहे.

(३) उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीत ग्रामपंचायत, वावर-वांगणी सरोळीपाडा या रस्ता रुंदीकरणाच्या कामांवर मृत व्यक्तीला मजूर म्हणून कामावर दाखवून हजेरीपट काढण्यात आल्याचे दिसून आले.

(४) १ शाखा अभियंता तसेच २ ग्रामरोजगार सेवक यांच्यावर जव्हार पोलीस स्टेशनमध्ये गु.र.क्र.४०/२०१५ भा.दं.वि.स. कलम ४०६, ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ४५१८७ (३०-०४-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयाला सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी २३६ कोटी, ९१ लाख रुपयांच्या आराखडयात मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये २५० कोटीची कामे अंतर्भुत असतांनाही त्यापैकी फक्त १० टक्के कामे म्हणजेच २.५ कोटी रुपयेच खर्च झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३-१४, २०१४-१५ या आर्थिक वर्षातील कामांच्या मंजूरी दिलेल्या आराखडयानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत किती कामे आतापर्यंत पूर्ण झाली असून किती कामे अपूर्ण आहेत व त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०१३-१४, २०१४-१५ या आर्थिक वर्षातील आराखड्यात अनुक्रमे ३९४६६ व ३६११० कामापैकी आतापर्यंत अनुक्रमे १०२५३ व ३४१५ इतकी कामे सुरु असून त्यापैकी अनुक्रमे ७५९४ व १६९८ इतकी कामे पूर्ण झाली आहेत व अनुक्रमे २६५९ व १७१७ इतकी कामे अपूर्ण आहेत.

जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावर अकुशल व कुशल खर्चाचे राखावयाचे ६०:४० चे प्रमाण असल्यामुळे कुशल कामावरील सर्व खर्च भागविणे शक्य होत नाही त्यामुळे भौतिकदृष्ट्या अनेक कामे पूर्ण होऊनही पूर्णत्वाचे दाखले एमआयएस वर अपलोड करता येत नाहीत. त्यामुळे कामे पूर्ण होऊनही अपूर्ण दिसतात. तसेच शासकीय यंत्रणेच्या संदर्भात वृक्ष लागवड व संवर्धनाचा कालावधी पाच वर्षाचा असल्याने व फळबाग लागवड व संवर्धनाचा कालावधी ३ वर्षाचा असल्यामुळे सदर कालावधी पूर्ण होईपर्यंत कामे अपूर्ण दिसतात.

---

**राज्यात ग्रामरोजगार सेवकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४) ७४९८१ (१४-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रामरोजगार सेवकांनी दिनांक १५ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र शासनाच्या नरेगा उपसचिवांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या मागण्यांसदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) ग्रामरोजगार सेवकांनी दिलेले निवेदन उप सचिव (रोहयो) यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. तथापि, मा.मंत्री (वित्त) यांना दि.१३/१२/२०१६ रोजी दिलेले निवेदन प्राप्त झालेले आहे.
(२) निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या आहेत :-

१. ग्रामरोजगार सेवकांना दरमहा १२ हजार मानधन देण्यात यावे.

२. ग्रामरोजगार सेवकांना मिळणारे मानधन त्यांच्या वैयक्तिक खात्यात जमा करण्यात यावे.

३. ग्रामरोजगार सेवक यांच्या TA, DA मध्ये वाढ करण्यात यावी.

४. ग्रामरोजगार सेवक यांना अपघाती विमा लागु करण्यात यावा.

५. ग्रामरोजगार सेवक यांना काढण्याचे अधिकार जि.प.कडे देण्यात यावे.

६. मनरेगा ही योजना स्वतंत्र करण्यात यावी.

७. ग्रामरोजगार सेवकांना नियुक्ती पत्र देण्यात यावे.

(३) ग्राम रोजगार सेवकांच्या मागण्यांबाबत दि.२४ मार्च,२०१७ रोजी मा.मंत्री (रोहयो) यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :-

१) ग्राम रोजगार सेवकांचे मानधन ६० दिवसांच्या आत त्यांच्या खात्यात जमा होईल अशी व्यवस्था जिल्हाधिकारी यांनी करावी असा निर्णय घेण्यात आला.

२) मानधनाबाबतचा सविस्तर प्रस्ताव संघटनेने शासनास सादर करावा.

३) ग्राम रोजगार सेवकांना काढून टाकण्याबाबत विस्तार अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्याची तरतूद आहे त्याऐवजी संबंधित गट विकास अधिकारी यांनी चौकशी करावी असा बदल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामविकास विभागाने मोठया रस्त्याच्या कामाचे छोट्या कामात रुपांतर करुन केलेला गैरव्यवहार

**(५) ७५३९१ (१९-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामविकास विभागाने मोठया रस्त्याच्या कामाची ३ लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीचे तुकडे पाडून त्यांचे ठेके दिल्याच्या रु.२५५ कोटी रस्त्यांच्या कामांच्या कंत्राटांची चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१८) :** (१) होय.

(२), (३) व (४) लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा पुरविणे (२५१५ १२३८) या योजनेंतर्गत सन २०१६-१७ साठी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद रु. २५५ कोटी इतकी करण्यात आली होती. सदर योजनेंतर्गत लोकप्रतिनिधींकडून प्रस्ताव सादर केले जातात.

सदर योजनेंतर्गत कामांची आवश्यकता व उपलब्ध निधी विचारात घेऊन कामे मंजूर केली जातात. तथापि, कामांची प्रत्येकी रक्कम व कामांची संख्या या बाबी संबंधित लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसारच मंजूर केल्या जातात. तसेच सदर कामांचे मंजूरी आदेश निर्गमित झाल्यानंतर ज्यांनी कामे सुचविली त्यांचेकडून मंजूर कामात बदल करण्यासाठी विनंती करण्यात आल्यास शासन निर्णय दि. २७.३.२०१५ मधील तरतुदीनुसार मंजूर कामांमध्ये बदल करून देण्यात येतात. तथापि, सुचविलेली कामे ही एकाच मोठ्या कामाचे तुकडे असू नये म्हणून याबाबत राज्यातील सर्व जिल्हापरिषद/सार्वजनिक बांधकाम विभागास आवश्यक त्या सुचना देण्याच्या अनुषंगाने परिपत्रक निर्गमित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

**आसोला खुर्द ते गव्हाण (ता.मनोरा, जि.वाशिम) येथील पांदण रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(६) ७५५८७ (१४-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसोला खुर्द ते गव्हाण (ता.मनोरा, जि.वाशिम) येथील पांदण रस्त्यांचे काम ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाचे झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर पांदण रस्त्याचे काम संबंधित ग्रामपंचायती मार्फत मग्रारोहयो अंतर्गत मजूरांकडून करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयाचा पर्यटन विकास आराखडा प्रलंबित असल्याबाबत**

**(७) ७६१९६ (१८-०४-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयाचा पर्यटन विकास आराखडा गेली ३ वर्षे शासनाकडे पडून असून दुसरीकडे गणपतीपुळे करिता आराखडा अद्याप ३ ते ४ वेळा बदलूनही पूर्ण झालेला नाही तसेच गणपतीपुळयातील ४० कोकणी हट्स गेले वर्षभरापेक्षा अधिक काळ बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणपतीपुळे येथे बांधण्यात आलेले ४० कोकणी हट्स वापराविना बंद असल्यामुळे सदरहू हट्सची अत्यंत दुरवस्था झाली असून हे हट्स पुन्हा नव्याने बांधण्याकरिता २ कोटीहून अधिक रक्कम अपेक्षित आहेत तसेच हट्स वापराविना पडून असल्याने प्रत्येक हट्समागे एका दिवसांचे १८०० रूपये इतके भाडेही मिळण्यापासून वंचित राहिल्याने मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(४) असल्यास, त्यानुसार गणपतीपुळयातील हट्स विनाविलंब कार्यान्वित होण्यासह रत्नागिरी पर्यटन विकासाच्या आराखडयास विनाविलंब मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०३-२०१८) :** (१) रत्नागिरी जिल्हयाचा पर्यटन विकासाचा सुधारित आराखडा दि.६/१/२०१७ रोजी शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे. गणपतीपुळे तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा ग्राम विभागाशी संबंधित असल्याने हा आराखडा त्या विभागास पाठविण्यात आला आहे. गणपती पुळे येथील ४० हटस् आयुर्मान संपल्याने व समुद्री वातावरणामुळे मोठ्या प्रमाणावर क्षतीग्रस्त झालेल्या असल्याने बंद आहेत.

(२) रत्नागिरी जिल्हयाचा पर्यटन विकास आराखडा पर्यटन विभागाच्या धोरण व योजनांनुसार करण्यासाठी व त्याकरिता तपासणी करण्यासाठी सदरचा कालावधी लागलेला आहे. कोकणी हट्सचे आयुर्मान संपल्याने तसेच ते समुद्रकिनाऱ्यावर असल्याने ते बंद आहेत.

(३), (४) व (५) संपूर्ण ४० कोकणी हटस् व परिसरातील गझीबो,पदपथ,विद्युत व्यवस्था,पाणी व्यवस्था इत्यादीची पुन:स्थापना करण्यासाठी अंदाजे रू.७०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. उपलब्ध निधीनुसार तसेच CRZ च्या अंतिम मान्यतेनंतर या कोकणी हट्सची तात्पुरत्या बांधकाम स्वरुपात(Temporary Structures) पुनर्निर्मिती करण्यात येणार आहे. रत्नागिरी जिल्हयाचा पर्यटन बृहद आराखडा मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे.

---

## परभणी जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) ७९२७७ (१५-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केली जाणारी कामे जिल्हयात बंद झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सहा महिन्यांपासून नरेगाच्या कामांकडे मजूर येत नसल्याने अधिकाऱ्यांनी मजुरांना जास्तीत जास्त कामे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत काम करण्यास मजूर येत नसल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, तदनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना जास्तीत जास्त कामे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
परभणी जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जानेवारी, २०१७ मध्ये एकुण ३४७ कामावर १३४८२ मजुरांची उपस्थिती होती.
(२) हे खरे आहे.
(३) गतवर्षी परभणी जिल्ह्याअंतर्गत सरासरी एवढे पर्जन्यमान झाल्याने रब्बी उत्पादनात वाढ झाली आहे. त्यामुळे मजुर वर्ग शेती कामाकडे वळल्याने रोजगार हमी योजने अंतर्गत कामाची मागणी कमी झाल्याचे दिसुन येते.
(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एप्रिल, २०१७ अखेर ४०३५ कामे शेल्फवर ठेवण्यात आलेली होती. ज्यामुळे २७,५७,९१० इतके मनुष्य दिवसाचा रोजगार उपलब्ध करुन देता येणे शक्य होते. तसेच प्राप्त मजुरांच्या काम मागणी प्रमाणे एकूण ९९९६ कामावर १८४३९ हजेरीपत्रके निर्गमित करण्यात येवून १८२९२५० एवढी मनुष्य दिवस निर्मिती झालेली आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुमबोडी (ता.जि.गडचिरोली) येथील मंडल अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार**

**(९) ८०१८२ (१२-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरुमबोडी (ता.जि.गडचिरोली) येथील भू.क्र.१०६ मढील १.६२ हे.आर व भू.क्र.१०३ मधील ६.०५ हे.आर जमीन सन १९९४ -९५ पूर्वी बेदखल जमीन होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मंडल अधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करून सदर बेदखल जमीन आपल्या पत्नीच्या नावे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर मंडळ अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१८) :** (१) (२) (३) (४) व (५) मौजा मुरुमबोडी ता. गडचिरोली येथील भु.क्र.१०६ आराजी १.६२ हे.आर व भु.क्र.१०३ आराजी ६.०५ हे.आर जमिनीवरील अतिक्रमण पंजीत श्रीमती हेमलता शामराव डोंगरे यांची सन १९९४-९५ ची अतिक्रमणाची नोंद होती, परंतु प्रत्यक्षात सदर जमिनीवर कोणाचेही अतिक्रमण नसल्याचे तसेच कोणाच्याही

कब्ज्यात व वहिवाटीत नसल्याचे चौकशी अंती स्पष्ट झाले. त्यामूळे सदर जमिनीवरील अतिक्रमण पंजीत श्रीमती हेमलता शामराव डोंगरे यांच्या नावे असलेली सन १९९४-९५ ची अतिक्रमणाची नोंद तहसिलदार, गडचिरोली यांनी दि.२१.१२.२०१६ च्या आदेशान्वये रद्द/खारीज केली आहे.

श्री. एस. के. डोंगरे, तत्कालीन मंडळ अधिकरी यांनी उक्त जमीन त्यांची पत्नी सौ. हेमलता शामराव डोंगरे यांचे नावे अतिक्रमण पंजीमध्ये नोंद घेतल्याच्या आरोपाबाबत त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्यासाठी दि. ११.१०.२०१७ रोजी ज्ञापन बजावण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयातील तहसिल कार्यालयात कार्यरत १८ संगणक चालकांना वेतन देण्याबाबत**

**(१०) ८०८५९ (१२-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा, बल्लारपूर, गोंडपिंपरी, कोरपना, जिवती, वरोरा, ब्रम्हपूरी, सावली, मूल, चिमूर (जि.चंद्रपूर) या तहसिल कार्यालयात गत पाच वर्षापासून कार्यरत १८ संगणक चालकांना नियुक्तीपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर संगणक चालकांनी जिल्हाधिकारी व मा. मुख्यमंत्री यांना वारंवार निवेदने देऊनसुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संगणक चालकांना वेतन न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर संगणक चालकांचे थकित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०३-२०१८) :** (१) नमूद तहसिल कार्यालयांत कोणतेही संगणक चालक कार्यरत नसल्यामुळे सदर बाब लागू नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्याच्या गंगाक्षेत्रातील भागाचा विकास करण्याबाबत**

**(११) ८१३४८ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूरच्या गंगेमुळे राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्याला क पर्यटन दर्जा असतानाही या भागाचा विकास होत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गंगाक्षेत्रातील भागाचा विकास करून दर्जा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१८) :** (१) व (२) जिल्हा नियोजन समितीच्या दि. १४.१०.२०११ च्या बैठकीत राजापूर(जि. रत्नागिरी) तालुक्यातील गंगातीर्थ या पर्यटन स्थळाला “क” वर्ग पर्यटन दर्जा देण्यात आला आहे. “क” वर्ग पर्यटन स्थळांचा विकास योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये या पर्यटन स्थळाकरीता रु. ३६.८९ लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. ३० मार्च, २०१७ रोजीच्या आदेशान्वये उन्हाळे गंगातीर्थ, ता. राजापूर येथील परिसर विकासासाठी रु. ९३.८१ लाख इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु. ४०.०० लाख वितरीत करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागेल त्याला विहीर धडक योजनेंतर्गत भंडारा जिल्ह्यात विहिरी बांधून देण्याबाबत**

**(१२) ८१९८१ (१५-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागेल त्याला विहीर धडक योजनेतंर्गत भंडारा जिल्ह्याला १ हजार विहिरिचा लक्षांक देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहिरीकरिता २१८१ अर्ज ऑनलाइन प्राप्त झाले असून अर्ज गरजू शेतकऱ्यांनी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अर्जानुसार गरजू शेतकऱ्यांना विहिर धडक योजनेतंर्गत विहिरी बांधून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) भंडारा जिल्हयाला प्राप्त १००० विहिरींच्या लक्षांकानुसार १००० विहिरी मंजुर करण्यात आल्या असुन ४ जानेवारी, २०१८ पर्यंत ८६५ सिंचन विहिरींची कामे सुरु करण्यात आलेली असुन त्यापैकी ३५० सिंचन विहिरींची कामे पुर्ण झालेली आहेत. उर्वरित ५१५ विहिरींची कामे प्रगती पथावर आहेत. दिलेल्या उद्दीष्टानुसार कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न व पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांग्री उगले (जि.बुलढाणा) येथील विहिर अधिग्रहणाच्या प्रस्तावावर व ग्रामपंचायतीच्या ठरावावर सरपंचाच्या खोटया सहया करुन निधीचा केलेला अपहार**

**(१३) ८३७२६ (१८-०४-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांग्री उगले (जि.बुलढाणा) येथील विहिर अधिग्रहणाच्या प्रस्तावावर व ग्रामपंचायतीच्या ठरावावर सरपंचाच्या खोटया सहया करुन निधीचा अपहार केल्याचे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषीवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी सरपंच यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-०३-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी केलेली आहे. चौकशी अहवालामध्ये पाणी टंचाई निवारणार्थ सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर ग्रामसचिवांनी सरपंचांना डावलून सरपंचाच्या खोटया सहयांचा ठराव ग्रामपंचायत सभेत सादर करुन प्रशासनाची दिशाभूल केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणात संबधित सचिव जबाबदार आहेत

(४) व (५) चौकशी अंती संबंधित ग्रामपंचायत सचिव यांनी निधीचा अपहार केल्याप्रकरणी दोषी आढळून आल्यानंतर त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात आली आहे.

---

**तेलंगे मोहल्ला (ता.महाड, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील खाडीच्या मध्यभागी बांधण्यात येणाऱ्या साकवचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१४) ८५०९० (११-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेलंगे मोहल्ला (ता.महाड, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील खाडीच्या मध्यभागी भात शेतीकडे जाण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या साकवचे काम ठेकेदारने अर्धवट सोडल्यामुळे व बांधबंदीस्थांच्या दुरवस्थेमुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सावित्री खाडीतून येणाऱ्या भरतीच्या पाण्याला रोखणारा स्वीच गेट कोसळल्यामुळे गावातील शेती आणि पाण्याचे स्तोत्रही बाधीत झालेले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांचे अंदाजपत्रक तयार असूनसुध्दा निधीची तरतुद नसल्यामुळे काम सुरू करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार स्वीच गेट व साकवाच्या कामासाठी निधी देण्यासह बांधबंदीस्थांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०३-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकीत साकवाचे काम सा.बां.विभागामार्फत प्रगतीत असून पुरेशी वाळू उपलब्ध नसल्याने काम करण्यास विलंब झाला आहे. वाळू उपलब्ध होताच सदर काम तात्काळ पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बांधबंदिस्तीचे काम जलसंपदा विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. या कामात उघाडीच्या कामाचा समावेश नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) साकवाचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार सा.बां.विभागामार्फत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बांधबंदिस्तीमधील उघाडीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूरी, प्राधान्यक्रम व निकषांना अनुसरुन जलसंपदा विभागामार्फत हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**नाशिक जिल्हयातील तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा मिळण्याबाबत**

**(१५) ८६२८२ (१२-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील श्री क्षेत्र जगदंबा देवी मंदिर कोटमगाव, श्री नागेश्वर मंदिर अंदरसूल, अनकाई आणि श्री शनिदेव मंदिर नस्तनपूर या यात्रास्थळांना /तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रस्तुत यात्रास्थळांना 'ब' वर्ग दर्जा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०३-२०१८) :** (१) व (२) होय. तथापि, प्रश्नांकीत तिर्थक्षेत्रांपैकी श्री शनिदेव मंदिर नस्तनपूर या तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

सदरहू प्रस्तावाची शासन निर्णयानुसार छाननी केली असता, त्यात आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत शासनाच्या दि. ८.९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, नाशिक यांना कळविण्यात आले आहे.

तसेच प्रश्नांकीत उर्वरीत तीर्थक्षेत्रांचे प्रस्ताव शासनस्तरावर योग्य त्या कागदपत्रांनिशी अद्याप प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सेवेत सन २००५ मध्ये आलेल्या कर्मचा-यांना ग्रॅच्युईटीचा लाभ देण्याबाबत**

**(१६) ८६३२७ (०४-०९-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत सन २००५ मध्ये आलेल्या कर्मचा-यांना ग्रॅच्युईटीचा लाभ देण्याचा निकाल महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकालाच्या अनुषंगाने शासनाने सदर कर्मचा-यांना ग्रॅच्युईटीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी वित्त विभागाच्या दि.३१.१०.२००५ च्या शासन निर्णयामधील तरतूदींच्या विसंगत आदेश पारित केले आहेत. तसेच सेवा उपदान कोणत्या नियमानुसार करावे याबाबत स्वयंस्पष्ट आदेश दिलेले नाहीत. यासंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई येथे पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करण्याची कार्यवाही शासनामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा विभागात ३९ हजार ४०० शेततळ्यापैकी केवळ ४ हजारच**
**शेततळी पूर्ण करण्यात आली असल्याबाबत**

**(१७) ८७५२३ (१२-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाची अनियमितता, दुष्काळ यामुळे शेतक-यांचे नुकसान होऊ नये, शेतात मुबलक पाणी रहावे यासाठी शासनाच्या वतीने मागेल त्याला शेततळे देण्याची योजना राबविली असून नांदेड जिल्हयात ५ हजार शेततळयाचे उद्दिष्ट असताना केवळ ५९९ शेततळयांचे काम पूर्ण झाले असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा विभागात ३९ हजार ४०० शेततळयांचे उद्दिष्ट असतांना त्यापैकी केवळ ४ हजार शेततळे पूर्ण झाले असून नांदेडमध्ये फक्त १२ टक्के तर लातूरमध्ये २१ टक्के काम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शेततळयांची उर्वरित कामे पावसाळयापूर्वी तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.

नांदेड जिल्हयास ५,००० शेततळ्याचा लक्षांक प्राप्त झाले होते. त्यानुसार दिनांक १७/५/२०१७ च्या दैनिक अहवालानुसार ५९९ शेततळे पुर्ण झालेली होती, परंतु मे २०१७ अखेर सुधारीत लक्षांक ४,००० झाले असुन त्यापैकी ९०८ शेततळे पुर्ण झाले होते. दि.६/१/२०१८ पर्यत १२११ शेततळे पुर्ण झाले आहे.
(२) हे खरे नाही.

मराठवाडा विभागात ३९६०० शेततळ्यांचे उदीष्ट असून दि.२१/१२/२०१७ अखेर २१०८१ इतके शेततळे पुर्ण झालेले आहेत. मे २०१७ अखेर नांदेड जिल्ह्यात २९.४०% व लातूर जिल्ह्यात ३०.९५% काम झाले आहे.
(३) शेतकऱ्यांच्या मागणी नुसार शेततळ्यांना मंजुरी देण्याचे काम सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोवाडा (ता.घाटंजी,जि.यवतमाळ) गावातील रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरींची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१८) ८८६४० (११-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोवाडा (ता.घाटंजी,जि.यवतमाळ) गावातील रोजगार हमी योजनेंतर्गत तब्बल ८७ विहिरींची कामे अपूर्ण असून या विहिरी सन २०१२ ते सन २०१४ या कालावधीमध्ये लाभार्थ्यांना मिळाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत लाभार्थी सातत्याने पंचायत समितीत जावून संबंधित अधिका-यांना हजेरीपट काढण्याविषयी विनंती करीत आहेत मात्र याकडे अधिकारी दुर्लक्ष करीत असून उक्त काम मागील काळापासून प्रलंबित असल्याने लाभार्थी शेतक-यांच्या पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार मंजूर विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत मोवाडा अंतर्गत सन २०१२ ते २०१४ या कालावधीत एकूण ७० वैयक्तिक सिंचन विहीरीच्या कामांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी ८ विहिरीची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ६२ विहिरीची कामे कालबध्दपध्दतीने पूर्ण करण्याचे नियोजन करुन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही,

तथापि, कार्यवाहीकरिता असलेली प्रस्तुत कामे स्थानिक स्तरावरील उद्भवलेल्या बाबींमुळे पूर्ण करण्यासाठी अडचणी येत असतात. जसे, संबंधित कामांसाठी पुरेशा मजुरांची उपलब्धता नसणे व त्यांच्याकडून कामांची मागणी प्राप्त न होणे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन संबंधित कामांची पूर्तता होण्याकरिता ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) सदर बाबतीत पंचायत समिती स्तरावर शहानिशा केली असता, ग्रामपंचायत स्तरावर मजुरांच्या मागणीप्रमाणे कामे सुरु करण्यात येत आहे व ग्रामसभेमध्ये मजुरांना रोजगार हमी योजनेच्या कामावर येणेबाबत आवाहन करण्यात येते. त्याप्रमाणे ग्रामरोजगार दिनाचे आयोजन करुन मजुरांची मागणी प्राप्त करुन घेऊन सदर कामे पूर्ण करण्याची व मजुरांची मजुरी थेट त्यांच्या बँक अकाऊंट मध्ये अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमीला ब वर्ग तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळाचा दर्जा मिळणेबाबत**

**(१९) ८९१८६ (१२-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमीला ब वर्ग तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळाचा दर्जा मिळणेसाठी जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवल्याच्या मुक्तीभूमीवर येणाऱ्या पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा निर्माण होण्यासाठी या स्थळाचा ब वर्ग तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळामध्ये समावेश करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ सप्टेंबर, २०१६ व दिनांक २५, २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-०३-२०१८) :** (१) येवल्याच्या मुक्तीभूमीला 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा व निधी उपलब्ध होण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी,नाशिक यांनी ग्राम विकास विभागास सादर केला होता. तो प्रस्ताव ग्राम विकास विभागाने दि.२८/११/२०१६ च्या पत्रान्वये सामाजिक न्याय विभाग, नगर विकास विभाग व पर्यटन विभाग या संबंधित विभागांकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविला होता.

(२) पर्यटकांना व भाविकांना जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्यासाठी सदर तीर्थस्थळाचा 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळामध्ये समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२१/४/२०१७ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी या स्थळास 'ब' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव 'ब' वर्ग पर्यटन स्थळे घोषित करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार तपासण्यात आला. तथापि, येवला येथील मुक्तीभूमीला तीर्थक्षेत्राचा किंवा पर्यटन स्थळाचा कोणताही दर्जा दिलेला नसल्यामुळे 'ब' वर्ग पर्यटनस्थळे घोषित करण्यासंबंधीच्या निकषांची पूर्तता होत नसल्यामुळे येवला मुक्तीभूमीला 'ब' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

'ब' वर्ग तीर्थक्षेत्रात समावेश करण्याची बाब नगर विकास विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागास योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**विराचीवाडी, मु.पो. आब्रंड, (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) येथे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहीरीचे बांधकाम करण्याबाबत**

**(२०) ८९७०९ (११-०८-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विराचीवाडी, मु.पो. आब्रंड, (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) येथे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहीरीचे बांधकाम करण्याबाबतचा ठराव ग्रामपंचायत, आंब्रड यांनी मान्य करुन सदर ठराव पंचायत समिती, कुडाळ यांच्याकडे दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी वा त्या दरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठरावाच्या अनुषंगाने पंचायत समिती कुडाळ यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विहिरीचे बांधकाम करण्यासह निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०३-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंर्गत विराचीवाडी, ग्रामपंचायत आंब्रड, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथील विहिरीच्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव दि.०८.०३.२०१७ रोजी पंचायत समिती, कुडाळ यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची उप अभियंता (लघु पाटबंधारे) उपविभाग कुडाळ यांनी छाननी केली असता, प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या होत्या.

ग्रामपंचायत आंब्रड यांनी सदर त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव लघु पाटबंधारे उपविभाग, कुडाळ यांच्याकडे सादर केल्यानंतर लघु पाटबंधारे उपविभाग, कुडाळ यांनी दि. ३०.१०.२०१७ अन्वये प्रस्तावास तांत्रिक मान्यता दिली असून गटविकास अधिकारी यांनी दि. ०२.११.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वडापूर (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदीवर बॅरेजकरिता निधी मिळण्याबाबत**

**(२१) ९००८२ (१२-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडापूर (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील भिमा नदीवर बॅरेजकरिता निधी मंजूर होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीवर बॅरेजकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय व किती कालावधीत उक्त बॅरेजची कामे पुर्ण करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उक्त बॅरेजसमुळे हजारो हेक्टर शेती ओलिताखाली येणार असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०३-२०१८) :** (१) होय. मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य, परिवहन, कामगार व राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या दि.२६/०४/२०१७ च्या पत्रान्वये मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे वडापूर येथे बॅरेज पध्दतीचा बंधारा बांधणेबाबत मागणी केली आहे.
(२) व (३) महामंडळाचे दि.३१/३/२०१७ चे पत्रानुसार रुपये २०.१३ कोटी किंमतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर शासनाने दि. २०/०९/२०१७ च्या पत्रान्वये वडापूर को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करणेसंदर्भात मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून संकल्पन करून घेऊन सविस्तर प्रस्ताव शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सदर बॅरेजचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पनचित्र संघटना, नाशिक यांचेकडून करून घेणेचे काम क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पातुर (जि.अकोला) येथे सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत पिंपळखुटा-राहेर रस्त्यावर लावण्यात आलेल्या वृक्षलागवडीत झालेला गैरकारभार**

**(२२) ९०४८१ (११-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर (जि.अकोला) येथे सामाजिक वनीकरण योजनेअंतर्गत पिंपळखुटा-राहेर रस्त्यावर लावण्यात आलेल्या वृक्षलागवडीत गैरकारभार झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पिंपळखुटा-राहेर (ता.पातूर जि.अकोला) या रस्त्यावर सामाजिक वनिकरण विभागाने सन २०१५ च्या पावसाळ्यात रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीची कामे केलेली नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील चिरेखाणीना संरक्षण कठडा बांधण्यात आला नसल्याबाबत**

**(२३) ९०८९७ (१२-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बहुतांश चिरेखाणीना कुंपण अथवा संरक्षण कठडा बांधण्यात आला नसल्याने चिरेखाणी उघडया स्थितीत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या उघडया चिरेखाणीमध्ये पावसाळयात पाणी साचत असल्यामुळे नागरिक व पाळीव प्राण्यांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर ठिकाणच्या चिरेखाणीना कुंपण अथवा संरक्षण कठडा बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०२-२०१८) :** (१) गौण खनिज उत्खनन परवाना देताना परवानाधारक यांनी गौणखनिज उत्खनन ठिकाणी कंपाऊंड घालणे बंधनकारक असल्याचे परवान्याच्या अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात येते. त्यानुसार दापोली तालुक्यातील चिरेखाणींना कंपाऊंड घालण्यात आलेले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(२४) ९१६०४ (०४-०९-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासनाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे त्यांनी दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास आझाद मैदानावर उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपोषणकर्त्यांच्या मागण्या मान्य करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ यांनी सामान्य प्रशासन विभागाला पाठविलेल्या दि. २१ मार्च, २०१७ रोजी च्या पत्रामध्ये १ मे,२०१७ रोजी संलग्न संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यासह लाक्षणिक उपोषण असे नमुद केले होते व त्यासोबत मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या दि. २२ मार्च,२०१७ च्या निवेदनाची प्रत सादर केली होती. सदर निवेदनाची प्रत ही सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त करून घेण्यात आली आहे.

(२) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत शासनातर्फे कर्मचारी संघटनांबरोबर नियमितपणे चर्चा केली जाते व रास्त मागण्यावर नियमानुसार उचित कार्यवाही केली जाते. २२ मार्च, २०१७ च्या निवेदनामध्ये सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे व सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करणे या दोन मागण्यांचा अंतर्भाव होता. सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यासंदर्भात नेमलेल्या श्री.खटुआ समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. तो प्राप्त होताच अंतिम निर्णय घेतला जाईल. दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने मंत्रीमंडळाच्या मान्यतेने घेतला आहे. दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना ही योजना सक्तीची असून त्यातून कोणत्याही संवर्गास वगळून जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### भंडारा व पवनी (जि.भंडारा) तालुक्यात शासनाने वितरीत केलेल्या भूखंडाबाबत

**(२५) ९१७९४ (१२-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व पवनी (जि.भंडारा) तालुक्यात सन १९८५ ते ८७ या कालावधीत गाव विस्तारीकरण योजनेअंतर्गत आबादी पाडून शासनाने भूखंडाचे वितरण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही भूखंडधारकांनी दुसऱ्यांच्या भूखंडावर घरे बांधून तर काही भूखंड धारकांनी अतिक्रमण करून शर्तभंग केल्यामुळे सदर भूखंड धारकांवर चालु दराप्रमाणे रुपये १ ते १.५ लक्ष दंड आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे भूखंड धारक एवढी मोठी रक्कम भरण्यास तयार नसल्याने १९८५ ते १९८७ च्या दरानुसार दंड आकारून भूखंड धारकांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१८) :** (१) (२) (३) व (४) सन १९८५ ते १९८७ या वर्षात भंडारा तालुक्यातील मौजा-खरबी, मौजा-चिखली, मौजा-कोरंबी, मौजा-वाकेश्वर, मौजा-चोवा, मौजा-बेरोडी या गावात गाव विस्तारीकरण योजनेअंतर्गत भुखंड पाडून नियमाप्रमाणे वितरण करण्यात आले होते. तसेच पवनी तालुक्यातील मौजा-कुर्झा, ईटगाव, येनोडा, जुनीना, खैरी दिवान, पालोरा चौ., ब्रम्ही या गावात भूखंड पाडून नियमाप्रमाणे वितरित केले होते.

भंडारा व पवनी तालुक्यात काही भूखंडांचे अनधिकृत हस्तांतरण केल्याने संबधितांकडून भूखंडाच्या मूल्यांकित रकमेच्या ७५% रक्कम आकारण्याबाबत उपविभागीय अधिकारी, भंडारा यांनी आदेशित केले आहे.

---

## मेळघाटामध्ये (जि.अमरावती) महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणा-या आदिवासी मजुरांची मजूरी प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ९२६३९ (१९-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटामध्ये (जि.अमरावती) महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणा-या शेकडो आदिवासी मजुरांचे शासनाकडे १० कोटी रुपये थकीत असून सदर रक्कम मनरेगा मजुरांच्या खात्यात ४ महिन्यांपासून जमा करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगा मजुरांवर उपासमारीची पाळी आली असून मजुरांचे अन्यत्र मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार आदिवासी मजुरांची थकीत रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्राप्त अहवालानुसार, मेळघाट विभागातील आदिवासी मजुरांचे शासनाकडे १० कोटी रुपये थकीत नाहीत. सद्यस्थितीत मेळघाट विभागातील आदिवासी मजुरांच्या मजुरीकरिता संबंधित डाकघर कार्यालयातून ३५.४० लक्ष रुपयांचे वाटपाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच पोस्टखात्याच्या स्तरावर तांत्रिक कारणामुळे प्रलंबित असलेली रक्कम मजुरांना प्राप्त होण्यासाठी शासनामार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. याशिवाय मेळघाट भागातील बहुतांश आदिवासी मजुरांची खाती पोस्टात असल्याने मजुरी वितरणात होणारा विलंब टाळण्यासाठी जास्तीत जास्त खाती बँकेकडे वर्ग करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद विभागात शेततळयांना अनुदान मंजूर करण्याबाबत

**(२७) ९३१२७ (२२-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद विभागात मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत किती शेततळयांची माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत अर्जाद्वारे मागणी केली आहे,
(२) असल्यास, त्यापैकी किती शेततळयांना मंजुरी देण्यात आली आहे व किती शेतकऱ्यांना अनुदान देण्यांत आले आहे,
(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आलेले नाही त्यांची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) औरंगाबाद विभागातील आठ जिल्हयात मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत मार्च २०१७ अखेरपर्यंत एकुण ५२५९८ शेततळ्यांची अर्जाव्दारे मागणी केली आहे.
(२) त्यापैकी, ३५६४८ शेततळ्यांना तालुकास्तरीय समितीने मंजुरी दिली असुन त्यापैकी ३०४२२ शेततळ्यांना कार्यारंभ आदेश दिले आहेत. मार्च २०१७ अखेर ७६३६ शेततळी पुर्ण झाली असुन त्यापोटी ७६३६ शेतक-यांना रुपये ३५५५.८३ लक्ष इतके अनुदान अदा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हयातील पंचायत समिती पोंभुर्णाकडून अनुदान मिळण्याबाबत

**(२८) ९३३५८ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील पंचायत समिती पोंभुर्णाकडून अनुदान मिळण्याकरिता विलंब होत असल्याने धडक सिंचन योजनेतंर्गत अनेक शेतक-यांनी आपल्या शेतामध्ये स्वतःजवळील रक्कमेची गुंतवणूक करुन विहिरीचे बांधकाम पूर्ण केले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, तद्नुसार उक्त अनुदान तात्काळ शेतक-यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पोंभुर्णा तालुक्यास ६१२ विहिरींचा लक्षांक देण्यात आला असून ५९८ लाभार्थी पात्र असल्यामुळे ५९८ विहिरींना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी ३७९ विहिरींना ले-आऊट दिले असून ३१९ विहिरींचे खोदकाम पूर्ण झालेले आहे. १४१ विहिरींचे बांधकाम पूर्ण झालेले असून संबंधित लाभार्थ्यांना बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व अंतिम देयक अदा करण्यात आले आहे. तसेच उर्वरित १७८ विहिरींच्या लाभार्थ्यांना झालेल्या बांधकामाच्या मोजमापानुसार देयक अदा करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अल्पभूधारक शेतकऱ्याना धडक सिंचन व रोजगार हमी योजनेतून विहीर मंजूर करण्यासाठी रहिवाशी दाखल्याच्या अटीमुळे अडचणी येत असल्याबाबत

**(२९) ९४८९५ (२७-१०-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अल्पभूधारक शेतक-याना धडक सिंचन व रोजगार हमी योजनेतून विहीर मंजूर करण्यात येतात परंतु यामध्ये रहिवाशी दाखल्याच्या अटीमुळे अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच अल्पभूधारक शेतक-यासाठी धडक सिंचन व रोजगार हमी योजनेतून विहीर मंजूर करण्यासाठी सदर शेती ज्या गावात आहे त्या गावाच्या मतदार यादीत शेतक-याचे नांव आवश्यक आहे व त्याला रहिवाश्याचा दाखला सादर करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक गावांमध्ये शेताचे शिवार हे दुस-या गावात असते किंवा एखादी व्यक्ती शहरात स्थायीक असते व त्याची शेती ही शहरालगतच्या खेडयात असते अशा वेळी त्या शेतक-याचे नांव शहराच्या मतदार यादीत असते तर सदरची व्यक्ती शेती असलेल्या खेडयात राहत नसल्याने त्याला उपरोक्त योजनांमधून विहीर घेण्यास तो पात्र होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दळण वळणाची साधने बदलली असल्यामुळे २५ ते ५० कि.मी. अंतरावर जरी शेती असली तर ती व्यक्ती शेती करुन शकते त्यामुळे अशा अल्पभूधारक शेतक-यासाठी उपरोक्त जाचक अटी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१९-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) रोजगार हमी योजनेच्या धडक / जवाहर सिंचन विहीर योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी मतदार यादीत नाव असण्याची अट नाही.

तथापि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहीर घेण्यासाठी लाभार्थ्याकडे जॉबकार्ड असणे आवश्यक आहे. सदर जॉबकार्ड लाभार्थी ज्या गावचा रहिवासी आहे, त्या गावच्या ग्रामपंचायती मार्फत दिले जाते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खारपाण पटटयातील गावांमध्ये रोहयो व धडक सिंचन योजनेतील विहीरी ऐवजी टयुबवेल अथवा विंधन विहीर देण्याबाबत**

**(३०) ९४८९९ (२७-१०-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारपाण पटटयातील गावांमध्ये विहीर खोदतांना अनेक अडचणी येत असल्याने या गांवामध्ये शासनाच्या रोहयो व धडक सिंचन योजनेतील विहीरी ऐवजी टयुबवेल अथवा विंधन विहीर मंजूर करण्यात येणार आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१९-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय वसाहत, वांद्रे येथील इमारत क्रमांक १४० ते १४२ च्या मागील परिसरात पसरलेली अस्वच्छता**

**(३१) ९४९३६ (१३-१०-२०१७). श्री.संजय कदम (दापोली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वसाहत, वांद्रे येथील इमारत क्रमांक १४० ते १४२ च्या मागील परिसरात तसेच सद्य:स्थितीत निष्कासित केलेल्या इमारत क्र.२३१, २३२ व अन्य इमारतींसमोरील भागात माहे जून, २०१७ पासून सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने सतत पाणी साठून चिखल व दलदल पसरली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरात सतत साठून राहणा-या पाण्यामुळे व लगत असलेल्या कचराकुंडीमुळे दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच इमारत क्रमांक १४१ व १४२ मधील रहिवाशांना सदनिकेमध्ये पाऊसामुळे व अन्य कारणामुळे गळती होत असल्याने दुरुस्ती करुन सदर गळती थांबविण्याबाबत इमारत क्रमांक

१४२ मधील रहिवाशांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी तसेच इमारत क्रमांक १४१ मधील रहिवाशांनी माहे जुलै-ऑगस्ट, २०१७ मध्ये विनंती अर्ज दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच इमारत क्रमांक १४१ च्या खाली असलेल्या फरश्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास काढून टाकल्या असून अद्याप त्या पुन्हा बसविण्यात आल्या नाहीत तसेच सदर इमारती खालील (सदनिका क्रमांक १४२/१ च्या बाजूला असलेल्या) ड्रेनेजच्या पाईपमधून पाण्याचा निचरा होत नसल्याने सांडपाणी साठून त्याचा सदर इमारतीतील तसेच आजूबाजूच्या (इमारत क्रमांक १४२/१) तळमजल्यावर राहणा-या रहिवाशांना याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर परिसरात डासांचा प्रादुर्भाव होऊ नये याकरिता साधारणत: किती दिवसांनी किटकनाशकांची फवारणी केली जाते,

(६) असल्यास, उपरोक्त इमारत क्रमांक १४० ते १४२ च्या मागील परिसरात सद्य:स्थितीत पसरलेला कचरा, सांडपाणी, चिखल तसेच अनावश्यक झाडे-झुडपे व कचरा इत्यादीची साफसफाई करुन सदर परिसरातील डासांचा झालेला प्रादुर्भाव त्वरीत दुर करण्यासह तेथील कचराकुंडी त्वरीत कायमस्वरुपी काढण्यासाठी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०३-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, इमारत क्र. १४२ मधील रहिवाशांनी ९ ऑगस्ट, २०१७ रोजी तक्रार नोंदवहीत नोंद केली होती व इमारत क्र. ब-१३४ ते ब-१४५ मधील रहिवाशांनी १६ ऑगस्ट, २०१७ रोजी निवेदन दिले होते.

(४) काही ठिकाणी जलनि:स्सारण वाहिनी तुटल्याने तत्कालीन स्थितीत पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नव्हता, हे खरे आहे. परंतु सद्यस्थितीत सदर वाहिन्यांची दुरूस्ती केलेली असल्याने इमारत क्र. ब-१४२ व ब-१४३ या इमारतीमधील पाण्याचा निचरा व्यवस्थित होत आहे.

(५) महानगर पालिकेमार्फत सर्व शासकीय वसाहतीत वेळोवेळी किटक नाशकांची फवारणी करण्यात येते.

(६) इमारत क्र. ब-१४० ते ब-१४२ च्या मागील परिसरात असलेल्या तीन चौक इमारत क्र. ब-२३० ते ब-२४१, ब-२४२ ते ब-२५३, ब-२५४ ते ब-२६२ निष्कासित करावयाचे असल्याने ते रिक्त करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत त्याभोवती वाढलेली झाडे-झुडपे वेळोवेळी काढण्यात येत आहेत. वर्षातुन तीन ते चार वेळा निष्कासीत करावयाच्या चौकांची साफसफाई करण्यात येते. चौक क्रमांक १४१ व १४२ मागील कचराकुंडी कायमस्वरुपी काढणेबाबत महानगरपालिकेमार्फत नियोजन करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या इन्टेन्सिव्ह तालुक्यांच्या वार्षिक कृती आराखड्यात येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यांचा समावेश करण्याबाबत**

**(३२) ९५६८६ (२२-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८-१९ च्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या इन्टेन्सिव्ह तालुक्यांच्या वार्षिक कृती आराखड्यात येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यांचा समावेश करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यांमधील दारिद्र्यरेषेखालील महिलांना स्वावलंबी करण्यासाठी या तालुक्यांचा सन २०१८-१९ च्या राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या इन्टेन्सिव्ह तालुक्यांमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये मानव विकास निर्देशांकांच्या आधारे येवला व निफाड या तालुक्यांचा इन्टेन्सिव्ह कार्यपध्दतीमध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने विचार करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भटक्या विमुक्तांना क्रिमिलीयर या संज्ञेमधून वगळण्याबाबत**

**(३३) ९६४४८ (०६-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भटक्या विमुक्तांना क्रिमिलीयर या संज्ञेमधून वगळण्यात येण्यासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे छाननीचे काम शासनाने सुरु केले असून त्याचा अद्याप निर्णय झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तात्काळ निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०३-२०१८) :** (१) राज्यातील विमुक्त जाती “अ” मध्ये समाविष्ट असलेल्या १४ जाती, भटक्या जमातीच्या यादी मधील समाविष्ट असलेल्या २३ व विशेष मागासवर्गातील

अनुक्रमांक ७ वरील १ अशा एकूण ३८ जाती क्रिमिलेअर तत्वामधुन वगळता येऊ शकेल अशी शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य शासनाकडे केली आहे.
(२), (३) व (४) राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदरहू शिफारशीवर जनतेच्या सूचना व हरकत मागविण्यात आल्या आहेत याबाबत जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती तसेच, विजाभज, इमाव व विमाप्र या सर्व प्रवर्गाच्या घटकांना क्रिमिलेअर तत्वातून वगळता येईल किंवा कसे याबाबतचा अहवाल दि. २०/११/२०१७ च्या पत्राद्वारे राज्य मागासवर्ग आयोग यांचे कडुन मागविण्यात आलेला आहे. आजून अहवाल आलेला नाही.

---

**पुणे कँटोन्मेंट बोर्डाला केंद्र शासनाकडून जीएसटीच्या मोबदल्यात अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(३४) ९८३२६ (०१-०१-२०१८). अ‍ॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वस्तु व सेवाकर (जीएसटी) माहे जुलै, २०१७ पासून लागू होऊन तीन महिने उलटले असून पुणे कँटोन्मेंट बोर्डाला केंद्र शासनाकडून जीएसटीच्या मोबदल्यात अनुदान मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कँटोन्मेंट बोर्डाचा "एलबीटी" च्या निधीमधून कर्मचाऱ्यांचा पगार, कार्यालयीन खर्च व अन्य खर्च केला जात होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती शासनाने पुणे कँटोन्मेंट बोर्डाला जीएसटी अनुदान लवकर मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१८) :** (१) कँटोन्मेंट बोर्ड केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीत येतो. कँटोन्मेंट बोर्ड कायदा, २००६ या केंद्रिय कायद्यानुसार त्याचे नियंत्रण होत असल्याने राज्य शासनाच्या कार्यक्षेत्रात संबंधीत विषय येत नाही.
(२) लागू नाही.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील मलवाडा ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेच्या निधीचा झालेला अपहार**

**(३५) ९८३६३ (०६-०१-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील मलवाडा ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१३ ते २०१७ या कालावधीत मृत असलेल्या व्यक्तिंच्या नावाने रोजगार हमी योजनेच्या निधीचा अपहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तथापि, श्री. अनंता तुंबडा व इतर ग्रामस्थांनी दि.१३.०९.२०१७ रोजी गटविकास अधिकारी, विक्रमगड यांचेकडे लेखी निवेदन दिले होते. त्यामध्ये ग्रामसेवक, सरपंच व रोजगार सेवक यांनी संगनमताने खोटया हजे-या लावून मयत माणसांच्या नावे पैसे काढणे, सन २०१६ मध्ये ६ ते ७ मस्टर काम करुनही मजुरी आजतागायत न मिळाल्याबाबत तक्रार केली आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी, पंचायत समिती, विक्रमगड यांचेकडून सविस्तर अहवाल मागविला असता सदर कामांवर सन २०१३ ते २०१७ या कालावधीत मृत मजुरांच्या नावाने खोटया हजेरी लावून मजूरीचे पैसे काढण्याची बाब निदर्शनास आली नाही.तथापि,काही प्रकरणी तांत्रिक अडचणीमूळे मजूरीची रक्कम संबंधित खात्यावर जमा करण्यास विलंब झालेला आहे.ज्याप्रकरणी अद्याप मजूरी प्राप्त नाही,त्याप्रकरणी मजूरीची रक्कम तातडीने खात्यावर जमा करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील जमिनीची केलेली अवैध विक्री**

**(३६) ९८७७५ (२१-१२-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील जमीन मालक श्री.विष्णू फडके यांनी जमिनीची श्री.शहा याना विक्री केल्याबाबत जमिनीवरील कुळ शिरोसे, शांताराम बनकरी व रामचंद्र कुंडले इत्यादींनी तहसिलदार, जिल्हाधिकारी, ठाणे, विभागीय आयुक्त व मा.महसूल मंत्री यांचेकडे वारंवार तक्रारी केल्या असून या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदारांनी संपूर्ण चौकशी करुन शहा कुटुंबीयांनी दाखल केलेला दाखला हा बनावट शेतकरी प्रमाणपत्र असून या जमिनी सरकारजमा करण्यास पात्र असल्याचा निकाल दिल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सुद्धा श्री. विष्णू फडके यांनी ३०० ते ४०० एकर जमीन शहा व अन्य ८ ते ९ व्यक्तींना विकल्याचे व तसेच जमिनीच्या कागदपत्रात फेरफार केल्याचे व यासाठी त्यांना

तत्कालीन तलाठी, तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी सहकार्य केल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी कुळांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जमिनीबाबत तहसिलदारांनी दिलेल्या निर्णयानुसार जमिनी शासन जमा न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून बेकायदेशीररित्या जमीन विकणाऱ्या श्री.विष्णू फडके व त्यास सहकार्य करणाऱ्या महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यासह उपरोक्त जमीन तात्काळ शासनजमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कांबा, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ५२, ७७, ६४, १२५ व ३५ या मिळकतीसंदर्भात प्रश्नात नमूद आशयाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

उक्त मिळकतीसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ९८३६/२०१४ मध्ये दिनांक १२/११/२०१४ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सामनेवाले श्री.संजय चंद्रकांत शहा व इतर यांनी ते शेतकरी असल्याबाबतचा कुठलाही सबळ पुरावा प्रकरणी दाखल केलेला नसल्यामुळे ते शेतकरी असल्याचे सिध्द होत नाही असे आदेश तहसिलदार, कल्याण यांनी पारीत केले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी पारीत केलेल्या दिनांक ०४/०८/२०१४ च्या आदेशाचे पुनर्विलोकन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ अन्वये करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनास सादर केला. मा.मंत्री (महसूल) यांच्या उक्त आदेशाचे पुनर्विलोकन करण्यास शासनाने मान्यता दिली असून प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ मधील तरतूदीनुसार शासनाकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे.

---

## जिल्हा परीषद, नगर परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती संदर्भातील सर्व दावे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्याबाबत

**(३७) ९९०७० (२१-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परीषद, नगर परिषद, पंचायत सिमती आणि ग्रामपंचायती संदर्भातील सर्व दावे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांएवजी जिल्हाधिकाऱ्यांना देण्याचा निर्णय राज्य शासनाने नुकताच घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्याकडे विविध खात्यांचा भार असल्याने पुणे जिल्ह्यातील अनेक दावे प्रलंबीत राहिले असून पुणे जिल्ह्यात सन २०१६ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकीमधील सदस्य पात्रतेबाबतचे सुमारे १४०० दावे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जिल्हा परीषद, नगर परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती संदर्भातील सर्व दावे पुर्वी प्रमाणे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१८) :** (१) व (२) राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेचा सर्वंकष विचार करुन यापुढे जिल्हापरिषद निवडणूका/ पंचायत समित्यांच्या निवडणूका व नगरपरिषद/ नगरपंचायत तसेच ग्रामपंचायत विषयक निवडणूकीच्या सर्व बाबी शासनाच्या दि. २४.०४.२०१७ च्या परिपत्रकान्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आल्या आहेत. पुणे जिल्हयात सन २०१६ मध्ये निवडणूक झाल्यानंतर सदस्य पात्रतेसंबंधी ३९४ दावे दाखल झाले होते. त्यापैकी ३४७ दावे निकाली काढले असून उर्वरित ४७ दावे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मे.चिंतामणी इंडस्ट्रिज, श्रीरामपूर व श्री रामदेव रिफायनरी, श्रीरामपूर (ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर) या दोन ऑईल कंपन्यांनी कोट्यवधी रुपयाचा विक्रीकर थकविल्याबाबत**

**(३८) ९९२६२ (२६-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.चिंतामणी इंडस्ट्रिज, श्रीरामपूर व श्री रामदेव रिफायनरी, श्रीरामपूर (ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर) या दोन ऑईल कंपन्यांनी शासनाचा सुमारे रुपये ६८ कोटीचा विक्रीकर थकविल्याबाबतची गोपनीय माहिती खबऱ्यांनी उपायुक्त विक्रीकर (व्हिजीलन्स), विक्रीकर भवन, माझगाव, मुंबई यांना दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खबऱ्याच्या माहितीनुसार वरील दोन्ही कंपन्यांवर छापा घातल्यानंतर सुमारे ६८ कोटी रुपयांचा विक्रीकर बुडल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येऊन देखील सदर कंपन्या सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नियमाप्रमाणे खबर देणाऱ्या इसमास वरील रक्कमेच्या १०% रक्कम बक्षिस म्हणून देण्यात आलेली नसून सदर खबऱ्यांने त्याच्या जीवास धोका निर्माण झाल्याबाबत तसेच नियमानुसार शासनाकडून १०% रक्कम बक्षिस देण्याबाबत मा. वित्त मंत्री यांच्याकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उक्त कंपन्यांवर कारवाई करण्यासह उक्त खबऱ्यांना बक्षिस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१८) :** (१) होय. दि.०२.०५.२०१५ रोजी श्रीरामपूर येथील एडीबल ऑईल कंपन्यांनी (मे.चिंतामणी इंडस्ट्रिज व मे.अतुल ट्रेडर्स व इतर) शासनाचा

विक्रीकर थकविल्याची माहिती खबऱ्याने विक्रीकर उपायुक्त (दक्षता), विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांना दिली होती.

(२) होय. मे.चिंतामणी इंडस्ट्रिज कंपनीवर दि.०८.०५.२०१५ ते १२.०५.२०१५ या कालावधीत अन्वेषणाची कार्यवाही करण्यात आली होती. अन्वेषणादरम्यान मे.चिंतामणी इंडस्ट्रिज या कंपनीत करचुकवेगिरी आढळून आली नाही. परंतु, सदर ठिकाणी मे.अतुल ट्रेडर्स ही अनोंदित कंपनी चालू असल्याचे आढळून आले व या कंपनीत करचुकवेगिरी आढळून आली.त्यानुसार कालावधी २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ साठी निर्धारणा पारित करुन कर, व्याज व शास्ती मिळून एकूण रु.४०,९३,२८,१६८/- इतकी मागणी करण्यात आलेली होती. त्यापैकी व्यापाऱ्याने आतापर्यंत रु.२७,२६,३२७/- इतकी रक्कम भरली व उर्वरीत रक्कमेची वसुली करु नये म्हणून व्यापाऱ्याने अपिल दाखल केलेले आहे.

(३) दि.०३.१०.२०१७ चे निवेदन अभिलेखावर उपलब्ध नाही.

(४) मे.अतुल ट्रेडर्स या प्रकरणात व्यापाऱ्याने आतापर्यंत रु.२७,२६,३२७/- इतकी रक्कम वसूल झाली असल्याने, Resolution No.STA-२००४/CR-१०३/Taxation/Mantralaya Mumbai दि.०५.०६.२००७ मधील अनुक्रमांक ६.१ नुसार Interim reward may be granted upto a maximum of ५% of the amount of advance tax recovered on establishing prima facie evasion of tax after visit of the investigation authority on the basis of the information provided by the informant, subject to a ceiling of Rs. १०,०००/- अनुसार देय असलेली रु.१०,०००/-इतके बक्षीस रक्कम खबऱ्यास Axis Bank धनादेशाद्वारे (धनादेश क्र०८७२८६) दि.२२.०६.२०१६ रोजी देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणात व्यापाऱ्याकडे उपलब्ध असलेल्या उर्वरीत वसुलीसाठी व्यापाऱ्याने अपिल दाखल केलेले आहेत, व सदर अपिलात निर्णय प्राप्त झाल्यावर व व्यापाऱ्याने देय कर, व्याज व शास्तीची रक्कम वसुल झाल्यावर उर्वरीत देय बक्षिस देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(५) वरीलप्रमाणे.

---

**पाचोरा-भडगांव (जि.जळगाव) नगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेचा विशेष बाब म्हणून लाभ मिळण्याबाबत**

**(३९) ९९३३३ (२६-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव नगरपालिका हद्दीतील शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेचा विशेष बाब म्हणून लाभ मिळण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. रोजगार हमी मंत्री यांना दिनांक १९ सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार सदर शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेचा विशेष बाब म्हणून लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१)होय, हे खरे आहे.
(२) राज्यात “क” वर्ग नगरपरिषद व नगर पंचायत क्षेत्रात राज्य रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करणेबाबत दिनांक ३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) येथील काळमांडवी धबधब्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार**

**(४०) ९९४४७ (२६-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) येथील पर्यटन स्थळ काळमांडवी धबधबाकडे जाणारा रस्ता ३४५२ (३४५२२९३६) पर्यटन अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये मंजूर असलेल्या कामात एक रुपयाही खर्च न करता अधिकारी व कंत्राटदार यांनी शासनाच्या निधीचा अपहार केल्याची बाब माहिती अधिकारात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाच्या ठिकाणी कुठलेही काम झालेले नसून काम कागदावर दाखवून अवैधरीत्या बनावट देयके बनवून अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करून निधी बळकावला आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०८-०३-२०१८) :** (१), (२) व (३) सदर रस्त्याच्या कामाबाबत कामे न करताच खोटी बिले काढण्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता,प्रादेशिक विभाग,मुंबई यांनी या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश अधीक्षक अभियंता,दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांना दिले असून चौकशीचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला पंचायत समितीचे अधिकारी, गटविकास अधिकारी व हिंगणा तामसवाडी येथे प्रधान स्वच्छता अभियानातील शौचालयासाठी लाच घेतल्याबाबत**

**(४१) ९९४८३ (२६-१२-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला पंचायत समितीचे अधिकारी, गटविकास अधिकारी व हिंगणा तामसवाडी येथील सरपंचाचा मुलगा व इतर तीन पंच प्रधान स्वच्छता अभियानातील शौचालयासाठी १४ हजार ९०० रुपयांची लाच घेतल्याची घटना माहे ऑगस्ट ,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार लाच घेणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०३-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून प्रस्तुत प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी मंजूरीबाबतचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी दि.२६/९/२०१७ च्या आदेशान्वये श्री.रमेश केशवराव देशमुख, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, अकोला यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांना दि.२३/८/२०१७ पासून निलंबित केले आहे. तसेच दि.६/९/२०१७ च्या आदेशान्वये श्री.स्वप्नील गोपालराव बदरखे व प्रशांत मधुकर टाले, समुह समन्वयक पंचायत समिती, पंचायत समिती विभाग, अकोला यांना दि.२२/८/२०१७ पासून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अतंर्गत समुह समन्वयक या कंत्राटी सेवेतून बडतर्फ केले आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी श्री.वेले, गट विकास अधिकारी व श्री.पंडे, सहायक गट विकास अधिकारी यांनी सापळा पडताळणीमध्ये प्रत्यक्ष लाचेची मागणी केलेली अथवा लाचेची रक्कम स्विकारलेली दिसून येत नसल्याने, त्यांना सद्यस्थितीत निलंबित करणे उचित वाटत नाही, तथापि त्यांची इतरत्र बदली करण्यात यावी, असा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. त्यानुसार श्री.पंडे, सहायक गट विकास अधिकारी यांची पदस्थापना गट विकास अधिकारी, पंचायत समिती महागांव, जि.यवतमाळ या पदावर दि.१४/२/२०१८ च्या आदेशान्वये करण्यात आली आहे.

तसेच, श्री.वेले, गट विकास अधिकारी यांच्या बदलीबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

---

**यवलूज - पोर्ले (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) येथील कासारी नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याला तडे गेल्याबाबत**

**(४२) ९९९९६ (२६-१२-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवलूज - पोर्ले (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) येथील कासारी नदीवरील कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याला सुमारे ५० वर्षे पूर्ण झाली असून बंधाऱ्याची मोठ्या प्रमाणात पडझड होवून मोठे तडे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुराच्या पाण्याने वाहून येणारी लाकडे पिलर मध्ये अडकल्यामुळे बंधाऱ्याच्या पिलरना मोठे तडे गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिलरना तडे गेल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जावून आजूबाजूच्या १४ गावातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीपाण्याचा प्रश्न निर्माण झाला असून, पाण्याअभावी उन्हाळी व रब्बी पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०६-०३-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) नाही.

(४) सदर बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्ती कामास विस्तार व सुधारणांतर्गत प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

---

## विक्रमगड तालुक्यात (जि.पालघर) रोजगार हमी योजनेची कामे मिळत नसल्याने मजुरांचे होणारे स्थलांतर

**(४३) १००१६२ (२६-१२-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) या आदिवासीबहुल तालुक्यातील भाताचे पिक नष्ट झाल्याने स्थानिक मजुरांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी रोहयोची कामे तातडीने सुरु करण्याची मागणी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक मजुरांना रोहयोची कामे तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विक्रमगड तालुक्यात ३०२ कामे सुरु असून सदर कामांवर ३५३७ मजूर उपस्थिती आहे. कामाची मागणी केलेल्या मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

---

**पाचोरा (जि.जळगांव) तालुक्यात लोहटार व कु-हाड येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवकांने केलेला गैरव्यवहार**

**(४४) १००७६० (०४-०१-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौदाव्या वित्त्त आयोगाच्या कामासंदर्भात पाचोरा तालुक्यात (जि.जळगांव) लोहटार व कुऱ्हाड येथील ग्रामपंचयातीच्या सरपंचासह ग्रामसेवकांवर गुन्हा नोंदवून अपहाराची रक्कम वसूल करण्यात यावी असे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांसह जिल्हाधिकारी यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०३-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) नाही. सदर प्रकरणी जबाबदार ग्रामसेवकांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) अधिनियम १९६४ मधील तरतुदी नुसार शिस्तभंगविषयी कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच जबाबदार सरपंच यांच्या विरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३९(१) नुसार अपात्र करणे संबधित कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजा वडधामना (जि.नागपूर) येथील ०.८१ हेक्टर आर एवढी जागा आठवडी बाजाराकरीता मिळणेबाबत**

**(४५) १०१०८२ (२१-१२-२०१७). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वडधामना (जि.नागपूर) येथील ०.८१ हेक्टर आर एवढी आठवडी बाजाराकरीता निश्चित केलेली जागा देण्याबाबत विधानसभा सदस्य, हिंगणा यांनी मा. महसुल मंत्री यांना दिनांक ०८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने वडधामना येथील ०.८१ हेक्टर आर एवढी जागा आठवडी बाजाराकरीता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१८) :** (१), (२) व (३) मौजा वडधामना ता.हिंगणा जि.नागपूर येथील स.क्र.१९७ मधील आराजी १.७७ हे.आर. पैकी ०.८० हे.आर. शासकीय जागा आठवडी बाजार व ओटे बांधकामाकरीता ग्रामपंचायत वडधामना यांना मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाबाबत संबंधित विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यात येत असून तद्नंतर पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

---

## अंबरनाथ पूर्व (जि.ठाणे) भागात दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबत

**(४६) १०१२७४ (२१-१२-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ पूर्व (जि.ठाणे) भागात दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ पूर्व भागात दुय्यम निबंधकाचे कार्यालय तातडीने सुरु करण्यात यावे अशी मागणी दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) अंबरनाथ पूर्व (जि.ठाणे) कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास होत असल्याने एकाच कार्यालयात दस्त नोंदणीसाठी गर्दी होत आहे. दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांची जलद व वेळेवर काम होत नसल्याने गैरसोय निर्माण होत असल्याच्या तक्रारी होत असल्याकारणाने अंबरनाथ तालुक्यात असलेल्या सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उल्हासनगर क्र.२, उल्हासनगर क्र.३ व उल्हासनगर क्र.४ या तीनही कार्यालयाचे कार्यक्षेत्र सामाईक करण्याचा प्रस्ताव नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून दि.१८.०१.२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नियोजन समितीतील ३० टक्के निधीच्या कपातीबाबत

**(४७) १०१३४२ (२६-१२-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने घोषित केलेल्या कर्जमाफी व इतर प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या ३०% निधी परत करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची बाब माहे नोव्हेंबर मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक आराखडयातून विविध योजनांचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून नियोजन समितीने सहा योजनेचा १००% निधी वितरीत केल्यामुळे शासनाच्या कपातीच्या धोरणामुळे प्रस्तावित विकास कामांना अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०१८) :** (१) होय. वित्त विभागाच्या दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकान्वये महसूली लेख्यातील ७०% व भांडवली लेख्यातील ८०% इतक्या मर्यादेत निधी उपलब्ध करुन देऊन या मर्यादापेक्षा जादा वितरीत केलेला व प्रत्यक्ष खर्च न झालेला निधी प्रत्यार्पित करण्याबाबत व केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांसाठी तरतूदी १००% निधी वितरण करण्याबाबतच्या दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबात शासनपत्र दिनांक १६.१०.२०१७ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात आले आहे.

(२) व (३) वित्त विभागाच्या दिनांक ०१.०२.२०१८ च्या परिपत्रकानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण / अनुसूचित जाती घटक / अनुसचित जमाती घटक योजना) तरतूदी १००% वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनपत्र दिनांक ०२.०२.२०१८ अन्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा वार्षिक योजनांतर्गत प्रस्तावित विकास कामांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तऱ्हाळा ते पार्डी ताड (ता.मंगरुळपीर, जि.वाशिम) येथील रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे प्रशासकिय मान्यता मिळूनही प्रलंबित असल्याबाबत

**(४८) १०१८०२ (२६-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तऱ्हाळा ते पार्डी ताड (ता.मंगरुळपीर, जि.वाशिम) येथील पांदन रस्ता म.ग्रा.रो.ह. योजनेंतर्गत "ब" स्तरावरील कामाला तहसीलदार, मंगरुळपीर यांनी दिनांक १८ डिसेंबर,२०१४ व दिनांक ३० मे, २०१६ ला प्रशासकिय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षे होऊनसुद्धा हा रस्ता तातडीने पूर्ण करण्यास संबंधित जिल्हा प्रशासन विलंब करीत असल्याबद्दल ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री व सचिव रो.ह.यो. तसेच यांना दिनांक ०७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रस्ता पूर्ण करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१२-०३-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) त-हाळा ते पार्डी ताड रस्त्याचे काम प्राधान्याने करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात आली असून सद्यस्थितीत हे काम सुरु आहे. मग्रारोहयो अंतर्गत जे जॉबकार्डधारक कामाची मागणी करतात त्यांना अकुशलचे कामावर सामावून घेता येते. त्यानुसार मजुरांना सदर कामावर सामावून घेण्यात आले आहे. प्रकरणी कुणीही दोषी नसल्यामुळे याबाबत कोणावरही कार्यवाही करण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्याच्या नियोजन समितीचा ५० % निधी पुन्हा शासनाकडे वर्ग करण्याबाबत

**(४९) १०२०१६ (२६-१२-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्याच्या नियोजन समितीचा ५० % निधी पुन्हा शासनाकडे वर्ग करण्याचे जिल्हा नियोजन समितीला शासनाने आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळातच जिल्हा नियोजनासाठी उपलब्ध होणारा निधी अत्यल्प असतांना व रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता शिल्लक राहणारा निधी अत्यंत अपुरा पडणारा असून जिल्ह्यातील महत्वांच्या विकासकामांवर त्याचा परिणाम होणार असल्याने निधीत कपात करण्यात येऊ नये अशी मागणी जिल्हा नियोजन समिती अध्यक्ष तथा पालकमंत्री रत्नागिरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) वित्त विभागाच्या दिनांक ०१.०२.२०१८ च्या परिपत्रकानुसार आता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण / अनुसूचित जाती घटक / अनुसूचित जमाती घटक योजना) तरतूदी १००% वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनपत्र दिनांक ०२.०२.२०१८ अन्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इतर मागासवर्ग विभागासाठी आवश्यक असलेल्या पदांचा आकृतिबंध सुनिश्चित करुन स्वतंत्र निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(५०) १०३६८१ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्गासाठी स्वतंत्र विभागाची दिनांक १० मार्च, २०१७ रोजी निर्मिती केली असून या विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद मिळाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागासवर्ग स्वतंत्र विभाग शासनाने निर्माण करुनही सदरहू विभागास इतर मागासवर्गीयासाठी विविध योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने इतर मागासवर्गासाठी कल्याणकारी योजना राबविता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार इतर मागासवर्ग विभागासाठी आवश्यक असलेल्या पदांचा आकृतिबंध सुनिश्चित करुन स्वतंत्र निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०३-२०१८) :** (१) व (२) नाही. हे खरे नाही. मंत्रिमंडळाच्या दि.२७.१२.२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०९.०३.२०१७ च्या अधिसूचनेन्वये विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये विजाभज विभागाच्या अखत्यारीतील योजनांवरील सर्व खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीतून सध्या भागविण्यात येत आहे.

(३) दिनांक २७.१२.२०१७ रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार नवनिर्मित विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाकरिता ५१ पदे मंजूर आहेत. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाच्या दि.०९.०६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये या विभागाकरिता ३० पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच या विभागाच्या दि.०६.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये आणखी २१ पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.०९.०६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून २९ पदे या विभागास वर्ग करण्यात आली असून सामान्य प्रशासन विभागामार्फत सचिवाचे १ पद भरण्यात आले आहे. दि.०६.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली उर्वरित २१ पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. नवनिर्मित विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण या मंत्रालयीन प्रशासकीय विभागासाठी एकूण ४९ नवीन लेखाशीर्ष उघडण्यात आलेली आहेत.

तसेच सदरहू नवीन लेखाशीर्षांतर्गत सन २०१८-१९ या वित्तीय वर्षापासून अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येणार आहे. क्षेत्रिय स्तरावरील पदांचा आकृतिबंध निश्चित करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.